*लघु व मध्यम उद्योगांना चालना देण्यासाठी एमएसएमई पार्क उभारणार – सुधीर मुनगंटीवार*

*घुग्गुस येथे अत्याधुनिक ग्रामीण रूग्णालय व सुसज्ज स्टेडियम उभारणार*

*नानाजी शामकुळे यांच्या प्रचारार्थ घुग्गुस येथे सुधीर मुनगंटीवार यांची विशाल जाहीर सभा*
=============================================================

गेल्या 5 वर्षात चंद्रपूर विधानसभा क्षेत्राच्या ग्रामीण भागात तसेच चंद्रपूर शहरात विकासाची असंख्य कामे आ. नानाजी शामकुळे यांच्या नेतृत्वात आम्ही पूर्णत्वास आणली आहे. कधी नव्हे एवढया मोठया प्रमाणावर निधी या क्षेत्रासाठी आम्ही मंजूर करविला. या विधानसभा क्षेत्राने, घुग्गुस शहराने माझ्यावर, नानाजी शामकुळे यांच्यावर भरभरून प्रेम केले आहे. पुन्हा एकदा नानाजी शामकुळे यांना आपण निवडून दिल्यास महिला बचतगटांद्वारे उत्पादीत वस्तुंच्या विक्रीसाठी बाजारपेठ आपण उभारू तसेच महिला बचतगटांच्या उद्यमशीलतेसाठी 75 लाख रू. किंमतीचे सुषमा स्वराज महिला उद्योग भवन उभारू तसेच घुग्गुस येथील सर्व सोयीं असे सुसज्ज असे ग्रामीण रूग्णालय व सुसज्ज स्टेडियम घुग्गुस येथे आपण उभारणार असल्याची ग्वाही अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. लघु व मध्यम उद्योगांना चालना मिळण्यासाठी चंद्रपूर विधानसभा क्षेत्रात एमएसएमई पार्क उभारण्याची घोषणा त्यांनी यावेळी केली.

नानाजी शामकुळे यांच्या प्रचारार्थ घुग्गुस येथे आयोजित जाहीर सभेत अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार बोलत होते. यावेळी मंचावर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष देवराव भोंगळे, घुग्गुस भाजपाचे अध्यक्ष विवेक बोढे, जिल्हा परिषद सदस्या नितू चौधरी, पंचायत समिती सदस्य निरीक्षण तांड्रा, सरपंच संतोष नुन्ने, शिवसेनेचे प्रभाकर चिकणकर, गणेश शेंडे, बंटी घोरपडे, राजकुमार गोडसेलवार, संजय तिवारी, पुंडलिक उरकुडे, श्रीनिवास इसारप, प्रकाश बोबडे, आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती. घुग्गुस शहरात व ग्रामीण भागात उत्तम रस्ते, पुलांची बांधकामे करत पायाभूत सुविधांचे जाळे आपण निर्माण करणार असल्याचे सुधीर मुनगंटीवार यावेळी बोलताना म्हणाले. सिंचनाच्या सुविधा, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी, विद्यार्थी विकास, अशा सर्वच क्षेत्रांना प्राधान्य देत चंद्रपूर विधानसभा क्षेत्र विकासाच्या मार्गावर अग्रेसर होईल अशा सर्वांगिण विकासासाठी पुन्हा एकदा नानाजी शामकुळे यांना सेवेची संधी द्यावी असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले.

यावेळी बोलताना जिल्हा परिषदेचे अध्यक्ष देवराव भोंगळे म्हणाले, केंद्रात भाजपाच्या नेतृत्वात नरेंद्रभाई मोदी यांचे सरकार आहे. राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात पुन्हा एकदा सरकार सत्तारूढ होणार आहे. जिल्हयाचे नेते सुधीरभाऊ मुनगंटीवार यांचे संपूर्ण सहकार्य नानाजी शामकुळे यांना विकासासंदर्भात लाभणार आहे. ही विकासाची खरी श्रृंखला आहे. ही श्रृंखला कायम राहावी ही जबाबदारी मतदार बंधू भगिनींची आहे. आपले मत हे विकासाला देवून लोकशाही समृध्द करावी असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले. सभेचे संचालन साजन गोहणे यांनी केले.

या सभेसाठी उसळलेला विशाल जनसमुदाय नानाजी शामकुळे यांच्या विजयाची साक्ष देणारा ठरला.